# कधी, कधी, वाटतं



कधी कधी मला
बसल्या जागी बसवत नाही
व्यथा आणि वेदनांच्या
संघर्षला घेववत नाही

अशावेळी वाटतं
येथून आता उठावं
उन्हा आणि पावसात
अनवाणी भटकावं

पाय नेतो तिथं
चालावं, फिरावं
मन शांत होण्या
भान हरवून घ्यावं

पण कधी कधी वाटतं
का कुठं जावं?
पाय भूमीत रोवून
वृक्षरूप व्हावं

सांजतारे प्रकटता
पश्चिमेकडे झुकावं
नभा रोखणा-या
क्षितिजा सरकवावं

चंद्रम्याच्या सहाणीनं
चांदणं उगाळावं
भरतीच्या सागराला
शुभ्रतेत फेसाळावं

पुंडलिका पाहाण्या
एका पाया उचलावं
विठ्ठलाच्या विटेवर
उभं तसंच रहावं..

— विजय पाठारे